# १२. भारतात वैधरित्या राहणारे विदेशी नागरिक

विदेशी नागरिक भारतात प्रवेश करताना तसेच राहत असताना त्यांच्याकडे तो ज्या देशाचा नागरिक आहे त्या देशाचे वैध पारपत्र आणि वैध भारतीय प्रवेश परवाना असणे आवश्यक आहे. तसेच त्याने भारतात प्रवेश केल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधित विदेशी नागरिक नोंदणी अधिका-याकडे 'विदेशी नागरिक' म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतु पर्यटक परवान्यावर येऊन भारतामध्ये १८० दिवस अथवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी भारतात वास्तव्य करू इच्छिणा-या विदेशी नागरिकास नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

काही अपरिहार्य कारणामुळे त्याला भारतामधील वास्तव्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास भारतातील वास्तव्याचा वैध कालावधी पूर्ण होण्यापूर्वी किमान **२ महिने अगोदर** संबंधित विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी [ ग्रामीण भागात पोलीस अधीक्षक तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस उप आयुक्त (विशेष शाखा) ] यांच्याकडे त्याबाबतचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत खालील कागदपत्रे ३ प्रतींत जोडली पाहिजेत.

(१) विहित नमुन्यातील मुदत वाढीचा अर्ज.

(२) पारपत्राच्या प्रती

(३) भारतातील प्रवेश परवान्याची प्रत.

(४) क्षतीपूर्ती बंद.

(५) विवाह दाखला.

(६) मूळ भारतीय असल्यास त्याबद्दलचा पुरावा, जसे जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी.

(७) नोकरी परवान्याची मुदतवाढ हवी असल्यास, संबंधित कंपनीशी करण्यात आलेल्या कराराची प्रत व संबंधित कंपनी अथवा संस्थेचे त्याबाबतचे पत्र.

(८) उद्योग परवान्याची मुदतवाढ हवी असल्यास भारतीय रिझर्व्ह बँकेचे परवानापत्र.

(९) एखाद्या देशाची निर्वासित व्यक्ती असल्यास तसे निर्वासित प्रमाणपत्र.

(१०) विद्यार्थी परवान्याची मुदतवाढ हवी असल्यास संबंधित शिक्षण संस्था, विद्यापीठाचे प्रमाणपत्र.

(११) संशोधन परवान्याची मुदतवाढ हवी असल्यास मानव संशोधन मंत्रालय, शिक्षण विभाग, नवी दिल्ली यांनी संशोधनास दिलेली अनुमती.

उपरोक्त कागदपत्रासह अर्ज संबंधित विदेशी नोंदणी अधिका-याकडे सादर केल्यानंतर प्रकरण त्यांच्या अखत्यारित येत असल्यास सुमारे १५ दिवसांमध्ये निर्णय होऊन अर्जदारास तसे कळविले जाईल.

प्रकरण राज्य शासनाच्या अखत्यारित येत असेल, तर विदेशी नोंदणी अधिकारी आपल्या अभिप्रायासह प्रकरण **७ दिवसांत** राज्य शासनास सादर करतील व राज्य शासन **१५ दिवसांत** निर्णय घेऊन त्याप्रमाणे परत विदेशी नोंदणी अधिका-यास आपला निर्णय कळवील व ते अर्जदारास राज्य शासनाने दिलेला निर्णय अवगत करतील.प्रकरण जर केंद्र शासनाच्या अखत्यारित येत असेल तर राज्य शासन आपल्या अभिप्रायांसह **१५ दिवसांत** प्रकरण केंद्र शासनास सादर करील. केंद्र शासनाकडून सदर प्रकरणी आदेश प्राप्त होताच, संबंधित विदेशी नोंदणी अधिका-याला त्याप्रमाणे कळविण्यात येईल व ते अर्जदारास केंद्र शासनाने दिलेला निर्णय अवगत करतील.

परंतु पर्यटक परवान्याची मुदत १८० दिवसांपेक्षा अधिक वाढविता येत नाही. फक्त अनिवार्य परिस्थितीत जसे—आजारपण, विमान तिकिटाची

अनुपलब्धता इत्यादी प्रकरणी पर्यटक परवान्याची मुदत १५ दिवसांनी वाढविण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. त्यासाठी आपले अर्ज उपरोल्लेखित कागदपत्राच्या प्रती तसेच वैद्यकीय दाखला अथवा विमान प्रवास तिकिटाच्या प्रतीसह विहित मुदतीत विदेशी नोंदणी अधिकारी यांना सादर करण्याची दक्षता घ्यावी.

## भारतीय नागरिकत्व

विदेशी नागरिकांना वैधरित्या ५ वर्षे भारतात वास्तव्य केल्यानंतर भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करता येतो. अशा विदेशी नागरिकांना संबंधित विदेशी नागरिक नोंदणी अधिका-याकडे विहित नमुन्यात ४ प्रतीत अर्ज करणे आवश्यक आहे. अशा अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे :—

(१) वैध पारपत्राची प्रत.

(२) वैध निवासी परवान्याची प्रत

(३) ट्रेझरी चलन रु.५०/-

(४) Oath and allegiance

(५) Indeminity Bond

(६) स्त्रियांच्या बाबतीत विवाहाचा दाखला

(७) स्त्रियांच्या बाबतीत (पती भारतीय असल्यास त्याच्या) अधिवासाचा दाखला किंवा पतीच्या भारतीय पारपत्राची प्रत

(८) रंगीत फोटोच्या ३ प्रती.

या प्रकरणी केंद्र शासनाकडे राज्य शासनामार्फत शिफारस करण्यात येते. त्यानंतर केंद्र शासन प्रथम नोंदणी करून त्यांचे विदेशी पारपत्र त्यांच्या दुतावासाकडे प्रत्यार्पित करण्यास सांगते. संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ते केंद्र शासनाकडून राज्य शासनास पाठविण्यात येते व राज्य शासनामार्फत संबंधितांना वितरित केले जाते.

# विदेशी जाणा-या व्यक्तींचे भारतीय दस्ताऐवज साक्षांकन् करण्याची पध्दत

विदेशी जाऊ इच्छिणा-या व्यक्तींना त्या देशाचा व्हिसा घेण्यापूर्वी, त्यांचे भारतीय दस्तऐवज साक्षांकन करून घेणे आवश्यक असते. अशा वेळी त्यांनी प्रथम ते दस्तऐवज महाराष्ट्र/केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त लेख प्रमाणकाकडून (Public Notary) लेख प्रमाणित (Notarised) किंवा कंपन्यांच्या बाबतीत मान्यताप्राप्त चेंबर ऑफ कॉमर्स यांच्याकडून प्रमाणित करून ते कक्ष अधिकारी, गृह विभाग, ९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ येथून दुपारी २ ते ५ या वेळात सांक्षांकित करून दिले जातात.

**हे साक्षांकन विनाशुल्क असून, दस्तऐवज त्याच दिवशी साक्षांकन करून परत दिले जातात.**